# गांधी स्मारक निधी, मुंबई

मणिभवन, १ला माला, १९ लॅबरनम रोड, गावदेवी, मुंबई ४०० ००७
☎०२२-२३८० ३३३२/📠०२२-२३८११७२६
Email: gsnmumbai@mtnl.net.in

क्रमांक : गा.स्मा.नि. पी.सी/१४सी/७८३ दिनांक : ०१/०२/२०१८

प्रिय भगिनी,

गांधी स्मारक निधी, मुंबई व्दारे पू. कस्तुरबा गांधी यांच्या ७४व्या पुण्यतिथी निमित्त गुरुवार, दि. २२ फेब्रुवारी २०१८ दुपारी २.०० वाजता मणिभवन, १ला माला, १९ लॅबरनम रोड, गावदेवी, मुंबई ४०० ००७ येथे महिलांसाठी भजन स्पर्धेचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

या भजन स्पर्धेत आपल्या महिला भजनी मंडळाने भाग घेऊन पू. कस्तुरबांना श्रध्दांजली अर्पण करावी ही विनंती.

**स्पर्धेचे नियम खालील प्रमाणे आहेत :**

१. भजन मंडळात कमीत कमी ८ व जास्तीत जास्त १० भगिनींना भाग घेता येईल.

२. भजन स्पर्धा मराठी व हिंदी भाषेत आयोजित केली आहे. भजन मंडळाने एका भाषेची निवड करुन एक भजन सादर करावे. (दोन्ही भाषेतील स्पर्धा एकत्रित घेतली जाईल)

३. भजन मंडळाने एका भाषेची निवड करुन एक भजन सादर करावे.

४. कोणत्याही संताचा अभंग, भक्तीगीत किंवा गवळण चालेल. (चित्रपटातील भक्तीगीत म्हणता येणार नाही)

५. भजनासाठी ५ मिनिटे दिली जातील.

६. भजनासाठी लागणारी सर्व साधन – सामग्री मंडळाला आणावी लागेल. (गांधी स्मारक निधी, मुंबई कडुन फक्त तबला व पेटीची सोय होऊ शकेल.)

७. स्पर्धेत भाग घेणा-या स्पर्धकांना खालील प्रमाणे पुरस्कार देण्यात येतील.

| | |
|---|---|
| प्रथम पुरस्कार | रु. १५००/- |
| व्दितीय पुरस्कार | रु. १०००/- |
| तृतीय पुरस्कार | रु. ७५०/- |

८. स्पर्धक मंडळांची संख्या १० पेक्षा कमी असल्यास परिक्षकांच्या निर्णयानुसार पारितोषिके देण्यात येतील.

९. स्पर्धा दुपारी २.०० वाजता सुरु होईल.

स्पर्धेत भाग घेऊ इच्छिणा-या महिला मंडळांनी पत्राव्दारे किंवा दूरध्वनी क्रमांक २३८० ३३३२/ २३८११७२६ वर गुरुवार, दि. १५ फेब्रुवारी २०१८ पूर्वी आपली स्विकृती कळवावी.

आपली,

(रक्षा मेहता)
उपाध्यक्षा